Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १९९ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION



तर समन्वय कुठे बिघडला?" गुलाबराव पाटलांचे भाजपला प्रत्युत्तर!
(पान २ वर)

Selected

बंगळुरू-मुंबई वंदे भारत स्लीपर रेल्वे 'या' तारखेपासून धावणार

मुंबई । बंगळुरू-मुंबई प्रवास आता अधिक वेगवान आणि आरामदायी होणार आहे. रेल्वे विभागाने बहुप्रतिक्षित बंगळुरू-मुंबई वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस सुरू करण्यास हिरवा कंदील दाखवला आहे. वाराणसी-नवी दिल्ली वंदे भारत स्लीपरनंतर रेल्वे मंत्रालयाकडून अवघ्या सात दिवसांत मिळालेली ही दुसरी मोठी मंजुरी आहे. चेन्नई येथील 'इंटिग्रल कोच फॅक्टरी'च्या तंत्रज्ञानावर आधारित आणि 'बीईएमएल'द्वारे निर्मित ही आकर्षक केशरी आणि राखाडी रंगाची रेल्वे लांब पल्ल्याच्या प्रवासाचा चेहरामोहरा बदलून टाकणार आहे. 'द इंडियन एक्सप्रेस'ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे. दक्षिण पश्चिम रेल्वेद्वारे चालवली जाणारी ही ट्रेन बंगळुरू ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई दरम्यान धावेल. वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १ नोव्हेंबरपासून ही ट्रेन प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.

५० टक्के आरक्षण मर्यादेत निवडणुका घेण्याचे न्यायालयाचे निर्देश; मात्र प्रत्यक्ष निवडणुकांना वर्षभराची प्रतीक्षा?

जि. प.पंचायत समिती निवडणुकांचा मार्ग मोकळा!

जन सम्राट टाईम्स

पुणे| महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय पक्षांसह इच्छुक उमेदवारांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. ओबीसी आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे दीर्घकाळ रखडलेल्या राज्यातील उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

नंदुरबारमध्ये खुल्या प्रवर्गासाठी जागाच नसल्याने नवा पेच

मात्र, आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश दिल्याने निवडणूक प्रक्रियेसमोरील काही अडचणी कायम आहेत. त्यातच मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी (एसआयआर), जनगणना, दुष्काळी परिस्थिती आणि प्रशासकीय तयारी यामुळे प्रत्यक्ष निवडणुका वर्षभर लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण आणि एकूण आरक्षणाच्या मर्यादेवरून निर्माण झालेल्या वादामुळे निवडणुका रखडल्या होत्या. सर्वोच्च



न्यायालयाने निवडणुकांवरील स्थगिती उठवताना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये, असे स्पष्ट केले आहे. निवडणुका न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी मे २०२५ मध्ये बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या आरक्षण व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास न्यायालयाने मान्यता दिली होती. मात्र, काही जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची एकूण टक्केवारी ५० टक्क्यांच्या पुढे जात असल्याने पुन्हा कायदेशीर पेच निर्माण झाला होता. सध्याच्या आरक्षण रचनेनुसार राज्यातील १७ जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असल्याची माहिती समोर आली आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेत आरक्षणाचे प्रमाण १०० टक्क्यांपर्यंत असल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे खुल्या प्रवर्गासाठी एकही जागा उपलब्ध नसल्याचा पेच निर्माण होऊ शकतो.

पालघर जिल्हा परिषदेतही आरक्षणाचे प्रमाण ९३ टक्के असल्याची माहिती आहे. याशिवाय राज्यातील ४३ पंचायत समित्यांमध्ये १०० टक्के आरक्षणाची परिस्थिती असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आरक्षणाची फेररचना करताना कोणत्या प्रवर्गाला किती जागा मिळणार, याकडे राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. राज्यात सध्या मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली गेल्याचा मुद्दा चर्चेत आहे. नव्याने नावनोंदणी, नावांमधील दुरुस्ती आणि हरकतींसाठी आयोगाकडे सुमारे १८ लाख ८० हजार अर्ज दाखल झाल्याची माहिती आहे. या अर्जांची छाननी करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यास विलंब झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

दुष्काळ, जनगणना आणि परीक्षांचेही सावट

याशिवाय फेब्रुवारीमध्ये प्रस्तावित जनगणना, दहावी-बारावीच्या परीक्षा आणि राज्यातील दुष्काळी परिस्थिती ही आव्हानेही प्रशासनासमोर आहेत. दुष्काळी उपाययोजनांसाठी यंत्रणेवर मोठा ताण असल्याने निवडणूक प्रक्रियेचे नियोजन पुढे ढकलले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जूनपर्यंत दुष्काळी परिस्थिती कायम राहिल्यास आणि त्यानंतर पावसाळा सुरू झाल्यास सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत निवडणुका लांबण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचा अधिकृत आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येईल, असे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा 'पॉवर गेम'; विधान परिषद निकालातून भाजपला गर्भित इशारा!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: विधान परिषद निवडणुकीतील निकालानंतर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. नागपूर आणि पुण्यातील राजकीय घडामोडींनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय ताकदीचा नवा संदेश दिला आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजपला स्वबळावर विजय मिळविण्याचा अतिआत्मविश्वास नडला का? महायुतीतील मित्रपक्षाला कमी लेखण्याची चूक भाजपने केली का? या प्रश्नांवरून राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ठाकरे बंधू एका पुस्तक प्रकाशन सोहळ्यात एकाच मंचावर आल्याने राजकीय चर्चांना आणखी उधाण आले आहे. शिंदेंचा शांत पण सूचक संदेश! विधान परिषद निवडणुकीतील निकालांकडे केवळ विजय-पराभव म्हणून पाहता येणार नाही. महायुतीतील प्रत्येक घटक पक्षाची ताकद आणि त्याचे राजकीय महत्त्व या निकालातून अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे. शिवसेनेला हलक्यात घेऊ नका, तिला बाजूला सारण्याचा किंवा राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न करू नका, असा गर्भित इशारा शिंदे यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिल्याची चर्चा आहे. शिवसेनेच्या सहकार्याशिवाय भाजपचा विजय सहज शक्य नाही, हा संदेश या निवडणुकीतून गेला असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनीही, आम्ही उठाव केला नसता तर आजची परिस्थिती वेगळी असती, अशा आशयाचे वक्तव्य केल्याने महायुतीतील सत्तासमीकरणांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. या वक्तव्यातून शिवसेनेच्या राजकीय



योगदानाची जाणीव भाजपला करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.या निवडणुकीत भाजपकडून काही राजकीय गणिते चुकल्याची चर्चा आहे. स्वबळावर विजय मिळवू शकतो, या आत्मविश्वासात मित्रपक्षाच्या ताकदीचा पुरेसा अंदाज घेतला गेला नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काँग्रेसमधील नेते एकत्रितपणे काम करणार नाहीत, या शक्यतेवर भाजपने भर दिला; मात्र शरद पवार यांच्या राजकीय खेळीचा अंदाज घेण्यात भाजप कमी पडल्याचे बोलले जात आहे. मतदानाच्या एक दिवस आधी कराळे मास्तर यांच्या निलंबनाच्या घडामोडीमुळे राजकीय वातावरण तापले.

कराळे मास्तर भावनिक झाल्याने त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली आणि त्यांच्या बाजूने मतांचे समीकरण बदलल्याची चर्चा आहे. त्यांच्या मतांमध्ये सुमारे दहा हजारांची वाढ झाल्याचा दावा केला जात आहे. याचाच भाजपच्या पराभवावर परिणाम झाल्याचे काही राजकीय निरीक्षकांचे विश्लेषण आहे. महायुतीचा धर्म की मित्रपक्षाची ताकद? मराठवाडा आणि पुणे परिसरात शिंदे गटातील काही नेत्यांनी शरद पवार यांच्या उमेदवारांना मदत केल्याचे आरोपही राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी शिवसेनेला महायुतीचा धर्म पाळण्याचा सल्ला दिला. त्यावर एकनाथ शिंदे यांनी, "आम्ही महायुतीचा धर्म पाळतो; सर्वांनीच पाळायला हवा," असे शांतपणे प्रत्युत्तर दिल्याचे सांगितले जाते. या उत्तरातून शिंदे यांनी थेट संघर्ष टाळत भाजपलाच आत्मपरीक्षणाचा संदेश दिला का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिवसेनेने मदत केली नाही म्हणून पराभव झाला, असे म्हणत भाजपच्या काही नेत्यांनी अप्रत्यक्षपणे शिंदे यांचे महत्त्व वाढवले आहे. महायुतीतील प्रत्येक घटक पक्षाची ताकद मान्य केल्याशिवाय विजयाचे गणित जुळणार नाही, हे या निकालांनी दाखवून दिल्याची चर्चा आहे. फडणवीस-ठाकरे भेट; नवा राजकीय डाव? दरम्यान, भाजपचे राजकारण केवळ पराभवातून धडा घेण्यापुरते मर्यादित राहत नाही. परिस्थितीनुसार नवी रणनीती आखणे हे भाजपचे वैशिष्ट्य मानले जाते. त्याच पार्श्वभूमीवर व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ठाकरे बंधू एकाच मंचावर आले. कार्यक्रमापूर्वी तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याचे वृत्तही समोर आले. या भेटीला राजकीय समीकरणांचा रंग देणे घाईचे ठरेल. मात्र, महायुतीतील अंतर्गत मतभेद, विधान परिषद निवडणुकीतील निकाल आणि बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या भेटीने चर्चेला नवा विषय दिला आहे.

२०१९ नंतर उद्धव ठाकरेंनी बोलवलंच नाही : फडणवीस

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: आज ग्रंथाली तर्फे प्रशांत कुलकर्णी यांच्या हास्यरेषा या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. राज ठाकरे, उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस एकाच मंचावर या निमित्ताने एकत्र आले होते. राज ठाकरेंनी जी टोलेबाजी केली त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शैलीत भाष्य केलं. तसंच उद्धव ठाकरेंनाही त्यांनी आपल्या भाषणातून टोला लगावला.हास्यरेषा या अत्यंत सुंदर पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात उपस्थित असलेले माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, माझे सहकारी आशिष शेलार आणि बंधू भगिनींनो सर्वच लोक डाव्या बाजूला गेले म्हणून जाणीवपूर्वक उजवीकडे आलो. आज अतिशय आनंदाची गोष्ट आहे की व्यंगचित्रकारांच्या कार्याचा गौरव करणारी आणि त्यांच्या इतिहासाचं संकलन करणारा ग्रंथ प्रशांत कुलकर्णींनी उत्तमपणे संपादित केला. या प्रकाशनासाठी मला राज ठाकरेंचा फोन आला. मग प्रशांतजीही मला भेटले. मलादेखील अतिशय आनंद वाटला. मगाशी आशिषजी असं म्हणाले की राज ठाकरेंनी फोन केला की देवेंद्रजी येतात. आशिषजी, २०१९ पर्यंत उद्धवजींनी जेव्हा जेव्हा फोन केला तेव्हा तेव्हा मी गेलो. २०१९ नंतर बोलवलंच नाही, नाहीतर गेलो



असतो. मी वाटच पाहात राहिलो. कार्यक्रमात शेवटचं भाषण देण्याचा फायदा हा आहे की यावर राज ठाकरे उत्तर देऊ शकणार नाहीत. त्यामुळे आजतरी मी काहीही बोललो तरी प्रति षटकार येणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. प्रशांत कुलकर्णींनी पुस्तकांचं उत्तम संकलन केलं आहे. जुनी व्यंगचित्रं, त्याचे संदर्भ, इतिहास, स्वगत सगळं आपण पाहतो तेव्हा हा विलक्षण प्रवास पाहण्यास मिळतो. १८८१ ते १९९७ पर्यंत विविध व्यंगचित्रकारांचं मनोगत आणि चरित्रं आणि त्यांची व्यंगचित्रं तुम्ही दिली आहेत. राज ठाकरे या ठिकाणी आहेत, पंडीत आहेत, निलेश खरे आहेत. ज्यांची व्यंगचित्रं पाहण्यास मिळतात. व्यंगचित्र ही अशी कला आहे ज्यातून एक शब्द न बोलता पाहिजे तेवढे फटकारे मारता येतात आणि जे सांगायचं आहे ते नेमकेपणाने सांगता येतं. परिस्थितीचं आकलन करण्यासाठी अग्रलेख लिहिता येतो तसंच काम व्यंगचित्र करतं असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. व्यंगचित्रकार हे काम त्या ठिकाणी करत असतात. एखादं व्यंगचित्र पाहिल्यावर जो आनंद आपल्याला मिळतो, आता तर आम्ही त्याचे विषय आहोत. प्रत्येक व्यक्तीला आपला फोटो सुंदर यावा असं वाटत असतं. पण अनेक कार्यक्रमांमध्ये गेल्यानंतर व्यंगचित्र मिळालं तर ते कसंही काढलेलं असलं तरीही ते चांगलंच वाटतं.

राज ठाकरेंचं दिलखुलास भाषण

मुंबई- : आज प्रशांत कुलकर्णी यांच्या हास्यरेषा या पुस्तकाचं प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. या निमित्ताने सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाच मंचावर होते. राज ठाकरेंनी आपल्या खास शैलीत भाषण केलं. आशिष शेलार भाषणात म्हणाले की राज ठाकरेंनी बोलवलं की देवेंद्र फडणवीस नेहमी येतातच. हा संदर्भ घेऊन राज ठाकरेंनी आपल्या शैलीत मुख्यमंत्र्यांना टोला लगावला.आशिष शेलार आत्ता म्हणाले की राज ठाकरेंनी बोलवलं की मुख्यमंत्री येतातच.

चकली, चिवडा, फरसाण आता FDA च्या रडारवर!

जन सम्राट टाईम्स



मुंबई | प्रतिनिधी: दिवाळीचा सण जवळ येताच बाजारपेठांमध्ये फराळ, मिठाई, चकली, चिवडा, लाडू आणि फरसाण यांची मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू होते. मात्र, सणासुदीच्या गर्दीत भेसळयुक्त, मुदत संपलेले तसेच निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ ग्राहकांच्या माथी मारले जाण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासनाने (FDA) दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तपासणी आणि कारवाईचा वेग वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. दिवाळीच्या काळात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या व्यावसायिकांवर प्रशासनाची विशेष नजर राहणार आहे. फराळ, मिठाई, चकली, चिवडा, फरसाण आणि इतर खाद्यपदार्थांची निर्मिती व विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी केली जाणार आहे. दिवाळी संपेपर्यंत ही मोहीम सुरू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे मुंढे यांनी स्पष्ट केले. मसाला उत्पादकांवर मोठी कारवाई दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मसाले आणि मसालेजन्य पदार्थांच्या निर्मिती व विक्रीवरही FDA ने लक्ष केंद्रित केले आहे. आतापर्यंत राज्यातील १,०५७ मसाला आस्थापनांची तपासणी करून चौकशी करण्यात आली आहे. त्यापैकी ९४ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच तब्बल ११ हजार ९६३ क्विंटल मसाले व मसालेजन्य पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत सुमारे १९.६९ कोटी रुपये असल्याची माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली. ही कारवाई गोडाऊन आणि उत्पादन कारखान्यांमध्ये करण्यात आली आहे. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. मुदत संपलेले आणि निकृष्ट पदार्थ विकणाऱ्यांवर नजर सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांची मागणी वाढल्याने काही ठिकाणी मुदत संपलेले, निकृष्ट दर्जाचे किंवा नियमांचे पालन न करता तयार केलेले पदार्थ विक्रीसाठी ठेवले जाण्याची शक्यता असते. अशा पदार्थांच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे उत्पादनाची तारीख, वापरण्याची अंतिम मुदत, गुणवत्ता, साठवणूक आणि स्वच्छतेच्या नियमांची तपासणी केली जाणार आहे. विशेषतः मिठाई आणि फराळाचे पदार्थ तयार करणाऱ्या व्यावसायिकांनी स्वच्छता व अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. दुकानदारांनीही अधिकृत व विश्वासार्ह पुरवठादारांकडूनच माल खरेदी करावा आणि मुदत संपलेले किंवा दर्जाहीन पदार्थ विक्रीस ठेवू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिवाळीपर्यंत कारवाईचा धडाका कायम दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी वाढत असताना FDA च्या विशेष मोहिमेमुळे खाद्यपदार्थ विक्रेते आणि उत्पादकांमध्ये सतर्कता वाढण्याची शक्यता आहे. ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, हा या मोहिमेचा उद्देश आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

फडणवीस, राज आणि उद्धव ठाकरे एकाच मंचावर

कार्यक्रमापूर्वी तीनही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याचं वृत्त

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचं दर्शन घडवणाऱ्या घडामोडी मुंबईत घडताना बघायला मिळाल्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकाच मंचावर एकत्र आलेले बघायला मिळाले आहेत. व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांच्या 'महाराष्ट्राची हास्यरेषा' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात तीनही नेते मुंबईत एकाच मंचावर एकत्र आले. विशेष म्हणजे तीनही नेत्यांमध्ये कार्यक्रमापूर्वी बंद दाराआड चर्चा झाल्याचं वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिलं आहे. दादरच्या स्वातंत्र्यवीर सावकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. राज ठाकरे यांचा मुख्यमंत्र्यांचा उल्लेख करत शेलारांना टोला राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात मंत्री आशिष शेलार यांच्या वक्तव्याचा दाखला देत मिश्किल टोला लगावला. "सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी सांगितलं की, मी मुख्यमंत्र्यांना बोलावलं की मुख्यमंत्री येतात. याच्यापुढेही मी मुख्यमंत्र्यांना बोलावत जाईन आणि ते येत जातील, असं त्यांचं म्हणणं आहे. 2029 पर्यंत मुख्यमंत्र्यांना ठेवा म्हणजे झालं. आता काय सांगू मी", असा टोला राज ठाकरे यांनी लगावला. त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. तीनही नेते एकत्र येण्यावर राज ठाकरे यांचं भाष्य "खरंतर एकमेकांवर टीका



करणारे आज एका मंचावर आले, अशी ब्रेकिंग न्यूज चालू आहे. काही व्यासपीठं अशी असतात की, ज्यावेळेला राजकीय मतभेद सोडून त्या मंचावर एकत्र यावं लागतं. ते व्यासपीठ कलेचं, संगीताचं, कधीकधी लग्नाचं असतं, पण अशाप्रकारे दररोज टीका आणि मतभेद एकमेकांवर व्यक्त करत असतील तरी अशा प्रसंगी व्यासपीठावर एकत्र येणं ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्यामुळे आज आम्ही सगळेजण एकत्र आलो आहोत", असं राज ठाकरे म्हणाले. 'पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीला पदवीधर लागत नाही', राज ठाकरेंचं मिश्किल वक्तव्य "व्यंगचित्र ही माझी आवडती गोष्ट होती. तीन वर्षे जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये घालवल्यानंतर मी कॉलेज सोडून दिले. त्यामुळे मी पदवीधर नाही. पण निवडणुकीला उभा राहू शकतो. कारण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीला पदवीधर लागतो, असं काही नाही. म्हणूनच या देशाची लोकशाही यासाठीच आहे. पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवाराच्या फॉर्ममध्ये सही अथवा आणि अंगठा लिहिलेलं बघायला मिळालं होतं. तो फॉर्म हेच एक व्यंगचित्र होतं", असं राज ठाकरे म्हणाले. कार्टुन आल्यावर चिडून अटक न करता ती गोष्ट कशी घेतो ते महत्त्वाचं : उद्धव ठाकरे यावेळी उद्धव ठाकरे यांनीदेखील भाषण केलं. "ब्रिटनचे पंतप्रधान लॉयड जॉर्ज होते. त्यांनी पंतप्रधान पद सोडल्यानंतर एका मुलाखतकाराने विचारलं की, तुम्ही पंतप्रधान असताना पदाचा ताण कसा सहन करायचे? काय करायचात तुम्ही? तेवढं सहन करुनही तुम्ही एवढे हसतमुख कसे असायचे? ते बोलले, मी काही करत नाही. मला सकाळी जाग आल्यानंतर अंथरुनातून बाहेर पडण्याआधी डेली एक्सप्रेस हे वृत्तपत्र बघतो. वृत्तपत्रांच्या धोरणांशी मी सहमत नसायचो. पण त्यातील स्टूपने काढलेले कार्टुन आवर्जुन पाहायचे आणि माझा दिवस आनंदात जायचा. कारण स्टूप यांनी माझ्यावर हसायला शिकवलं. स्वत:वर हसायला शिकणं आणि ते तसं घेणं कारण कार्टुन आल्यावर चिडून ते बंद करणं, पेपर बंद करुन टाक, त्याला अटक न करता तुम्ही ती कशी घेता हे महत्त्वाचं आहे. हा गुण आपण सगळ्यांनी आत्मसात केला पाहिजे", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

“दोन जागा अधिक जिंकता आल्या असत्या, तर समन्वय कुठे बिघडला?” गुलाबराव पाटलांचे भाजपला प्रत्युत्तर!

विधानपरिषद निवडणुकीतील आरोपांवर दिले जशास तसे उत्तर

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : विधानपरिषद निवडणुकीतील निकालानंतर महायुतीतील समन्वयावरून भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांमध्ये वक्तव्यांची देवाणघेवाण सुरू झाली आहे. शिवसेनेने योग्य समन्वय ठेवला असता, तर महायुतीला आणखी दोन जागा जिंकता आल्या असत्या, असा दावा भाजपकडून करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी या आरोपांना प्रत्युत्तर दिले. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत पक्षापेक्षा उमेदवाराची प्रतिमा, वैयक्तिक संपर्क आणि प्रभाव महत्त्वाचा ठरतो, असे सांगत त्यांनी या निवडणुकीचे गणित स्पष्ट केले. विधानपरिषद निवडणुकीतील महायुतीच्या कामगिरीवरून निर्माण झालेल्या चर्चेबाबत बोलताना पाटील म्हणाले की, शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांमध्ये निवडणुकीचे स्वरूप वेगळे असते. येथे केवळ पक्षीय समीकरणांवर विजय अवलंबून नसतो, तर उमेदवाराची स्वतःची प्रतिमा आणि मतदारांमधील प्रभावही निर्णायक ठरतो. महायुतीत काही दुरावा निर्माण झाला असेल, तर तो दूर करण्याचा अधिकार आपल्यासारख्या कार्यकर्त्यांकडे नसून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिकच्या जागेवरून शिवसेनेने बदला घेतल्याच्या चर्चेलाही त्यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. “आमचे २३७



आमदारांचे भक्कम सरकार आहे. अशा परिस्थितीत व्यक्तिगत किंवा राजकीय बदला घेण्याचा प्रश्नच येत नाही,” असे ते म्हणाले. त्यामुळे विधानपरिषद निकालाला महायुतीतील संघर्षाचे स्वरूप देणे योग्य नसल्याचा संदेश त्यांनी दिला. दरम्यान, महायुतीला आत्मचिंतनाची गरज असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटल्याच्या मुद्द्यावर गुलाबराव पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. “संजय राऊत यांनी आधी स्वतःचे आत्मचिंतन करावे. त्यांच्याकडे अजून आत्मा शिल्लक आहे का, हे तपासावे आणि मगच चिंतनाच्या गोष्टी कराव्यात,” अशा शब्दांत त्यांनी राऊत यांच्यावर टीका केली. जळगाव महापालिकेच्या कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना वेळेवर निमंत्रण दिले जात नसल्याच्या चर्चाही त्यांनी फेटाळून लावल्या. संबंधित कार्यक्रमासाठी सर्व लोकप्रतिनिधींना दोन दिवस आधीच निमंत्रण देण्यात आले होते. नगरसेवक, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, खासदार, आमदार आणि मंत्री उपस्थित होते. जळगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वजण एकजुटीने काम करण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अब्दुल सत्तार यांनी भाजपच्या विरोधात काम केल्याच्या आरोपावर मात्र त्यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. हा विषय आपल्या कार्यक्षेत्रातील नसून, तेथे नेमके काय घडले याची पुरेशी माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत स्थानिक नेतेच अधिकृत भूमिका मांडू शकतील, असेही ते म्हणाले. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीबाबतही गुलाबराव पाटील यांनी भूमिका स्पष्ट केली. आपण उमेदवारी अर्ज दाखल करायचा की नाही, याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. अर्ज दाखल केल्यानंतर माघारीसाठी जवळपास १८ दिवसांची मुदत असते. त्यामुळे इच्छुक कार्यकर्त्यांना अर्ज भरण्यापासून रोखणे योग्य ठरणार नाही. अर्ज दाखल झाल्यानंतर महायुतीतील तिन्ही घटक पक्ष एकत्र बसून जागावाटपाचा तोडगा काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्हा बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करताना त्यांनी बँकेचा एनपीए ५९ टक्के असल्याचे सांगितले. बँकेचे हित जपणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

फायनान्स कंपनीने शेतकऱ्याचे घर सील केले; बच्चू कडूंनी हातोड्याने कुलूप तोडून दिला प्रवेश!

कर्जबाजारी शेतकरी कुटुंबाची व्यथा ऐकून बच्चू कडू आक्रमक

जन सम्राट टाईम्स

अमरावती। प्रतिनिधी : कर्जाची परतफेड करता आली नाही म्हणून फायनान्स कंपनीने शेतकऱ्याचे घरच सील केले. घरातील संसार उघड्यावर आला, मुलाबाळांसह कुटुंबाला घराबाहेर राहण्याची वेळ आली. आधीच आर्थिक संकट, त्यात मुलाच्या मृत्यूचे दुःख आणि आता घरावर आलेले संकट... अशा दुहेरी-तिहेरी आघातांनी खचलेल्या शेतकरी कुटुंबाच्या मदतीला प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू धावून आले. त्यांनी थेट हातोडा हातात घेत घराचे कुलूप तोडले आणि कुटुंबाला पुन्हा घरात प्रवेश मिळवून दिला. या घटनेनंतर फायनान्स कंपन्यांना त्यांनी कडक शब्दांत इशाराही दिला. “गरजू कुटुंबांना त्रास दिला, तर अशा कंपन्यांविरोधात माझा हातोडा तयार असेल,” असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला. कर्जाचा डोंगर, मुलाच्या मृत्यूचे दुःख अन् घरही सील! गोपाल राठोड यांनी एका फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले होते. मात्र, बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना कर्जाची नियमित परतफेड करणे शक्य झाले नाही. त्यातच कोरोना



काळात त्यांच्या मोठ्या मुलाचा मृत्यू झाला. या दुःखद घटनेमुळे कुटुंबावर मानसिक आणि आर्थिक संकट अधिकच गडद झाले. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसताना कर्जाचा बोजा वाढत गेला. परिस्थिती सुधारण्याऐवजी अधिकच कठीण होत गेली. अशा परिस्थितीत फायनान्स कंपनीने दोन दिवसांपूर्वी गोपाल राठोड यांचे घर सील केले. परिणामी, कुटुंबातील सदस्यांना घराबाहेर राहण्याची वेळ आली. गेल्या चार दिवसांपासून लेकरांसह घराबाहेर झोपावे लागत असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. एका बाजूला दुष्काळाचे सावट, दुसरीकडे शेती विकण्याचा प्रयत्न करूनही खरेदीदार मिळत नसल्याने या कुटुंबाची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. “रात्रभर झोप लागली नाही; शेतकऱ्याच्या घराचे कुलूप तोडलेच!” या घटनेची माहिती मिळाल्यानंतर बच्चू कडू यांनी तातडीने शेतकरी कुटुंबाची भेट घेतली. “माझ्या डोळ्याला रात्रभर झोप लागली नाही. या शेतकऱ्यासोबत असे घडल्याचे समजल्यानंतर मी ठरवले की, त्याने आत्महत्या करण्यापूर्वी आपण त्याच्या घरी जायचे आणि त्या घराचे कुलूप तोडायचे,” अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. कुटुंबाची परिस्थिती पाहून त्यांनी हातोड्याने घराचे कुलूप तोडले आणि घराची दारे पुन्हा उघडून दिली. या कृतीतून त्यांनी केवळ एका कुटुंबाला घरात प्रवेश मिळवून दिला नाही, तर आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासन आणि समाजाचे लक्ष वेधण्याचाही प्रयत्न केला. शेतकरी कुटुंबाची दिवाळी अंधारात जाऊ नये, यासाठी त्यांना घरात प्रवेश मिळवून देत दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. “शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारे कायदे मान्य नाहीत!” बच्चू कडू यांनी फायनान्स कंपन्यांच्या वसुली पद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. “दुष्काळ तोंडावर आहे. शेतकरी आपली शेती विकायला तयार आहे; पण शेती विकत घ्यायलाही कोणी तयार नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने कर्जाची परतफेड कशी करायची? शेतकरी आधीच संकटात असताना त्याचे घर सील करून त्याला रस्त्यावर आणणे कितपत योग्य आहे?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. “वास्तविक कायदा हातात घेतला पाहिजे असे नाही. पण कायदाच शेतकऱ्याच्या मुळावर उठणार असेल, तर असे कायदे तोडायला आणि त्यासाठी मरायलाही बच्चू कडू तयार आहे,” असा संतप्त इशारा त्यांनी दिला. गरजू आणि संकटग्रस्त कुटुंबांना फायनान्स कंपन्यांनी त्रास देऊ नये, अन्यथा अशा कंपन्यांविरोधात आपला हातोडा तयार असेल, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. शेतकऱ्यांच्या कर्जप्रश्नावर पुन्हा ऐरणीवर चर्चा या घटनेमुळे शेतकरी कर्जबाजारीपणा, खासगी फायनान्स कंपन्यांची वसुली पद्धत आणि आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कर्जतच्या वनजमिनीवर आणखी एका धरणाचा भार

जन सम्राट टाईम्स

अलिबाग | प्रतिनिधी : टोरंट पॉवर प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन हस्तांतरित करण्यावरून आणि त्यासाठी झालेल्या वृक्षतोडीवरून संताप व्यक्त होत असतानाच, आता आणखी एका धरणासाठी कर्जत तालुक्यातील वनजमिनीची मागणी केली जाणार असल्याचे समोर आले आहे. पोशीर या प्रस्तावित धरणासाठी तब्बल ७७७ हेक्टर वनजमीन हस्तांतरित करण्याची मागणी करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील पाण्याची तहान भागविण्यासाठी कर्जत तालुक्यात तब्बल सात धरणे उभारली जाणार आहेत. यापैकी पाली-भूतिवली आणि टाटा पॉवर धरणांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कोंढाणे, पोशीर आणि शिलार या धरणांसह टोरंट पॉवर प्रकल्पाअंतर्गत दोन धरणे प्रस्तावित आहेत. टोरंट पॉवर प्रकल्पाला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली असून, त्यासाठी भीमाशंकर अभयारण्यालगतच्या परिसरातील २३३ हेक्टर वनजमीन हस्तांतरित करण्यात आली आहे. आता पोशीर धरणासाठी आणखी ७७७ हेक्टर वनजमीन हस्तांतरित करण्याच्या हालचाली सुरू आहेत. या दोन्ही प्रकल्पांसाठी मिळून सुमारे एक हजार हेक्टर वनजमीन बाधित



होण्याची शक्यता आहे.पोशीर धरणासाठी कर्जत तालुक्यातील सहा गावांमधील जैवविविधतेने समृद्ध असलेल्या वनक्षेत्रावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू आहेत. अलिबागच्या उपवनसंरक्षक कार्यालयाने याबाबत अधिकृत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला असला, तरी या प्रकल्पासाठी वनजमिनीची मागणी असल्याचे मान्य केले आहे. कुरुंग गावाजवळ पोशीर धरणाची उभारणी करण्यात येणार आहे. सुमारे ६ हजार ३०० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पासाठी जलसंपदा विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. १२ टीएमसी पाणीसाठवण क्षमता असलेल्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. वनजमीन हस्तांतरणाचे प्रयत्न सुरू आहेत. आमच्या भागात भरपूर पाऊस पडतो म्हणून एकाच तालुक्यात सात धरणे बांधली जात आहेत. या प्रकल्पांमुळे येथील वने उद्ध्वस्त होणार आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील नाराजी संपेना; मुंबईतील या नेत्यांने दिला पदाचा राजीनामा

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) मुंबई अध्यक्षपदी विधान परिषद आमदार झिशान सिद्दीकी यांच्या निवडीमुळे नाराज झालेले पक्षाचे मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ कांबळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कांबळे यांच्या राजीनाम्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस पुन्हा चव्हाट्यावर आली आहे. समीर भुजबळ यांना विधानसभा निवडणुकीत पक्षाने उमेदवारी नाकारल्याने त्यांनी मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हापासून मुंबई अध्यक्ष पद रिक्त होते. सिद्धार्थ कांबळे हे कार्याध्यक्ष या नात्याने पक्षाचे मुंबईतील काम पाहत होते. आपल्याला अजित पवार यांनी मुंबई अध्यक्षपदी नियुक्त करण्याचा शब्द दिला होता, असा कांबळे यांचा दावा आहे. कांबळे हे मुंबईत पक्षाचा दलित चेहरा आहेत. कांबळे यांनी अध्यक्षपदाच्या निवडीबद्दलची खदखद समाजमाध्यमावर व्यक्त केली आहे. कांबळे हे मुंबै जिल्हा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष



आहेत. झिशान सिद्दीकी यांची मुंबई अध्यक्षपदी निवड करताना मुंबईतील सहा जिल्हाध्यक्ष आणि दोन्ही कार्याध्यक्षांना पक्ष नेतृत्वाने विश्वासात घेतले नसल्याची भावना आहे. राष्ट्रवादीने काल राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते म्हणून उमेश पाटील आणि मुंबई अध्यक्ष म्हणून झिशान सिद्दीकी यांच्या निवडी घोषित केल्या. उमेश पाटील यांच्या निवडीलाही दिल्लीचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते बृजमोहन श्रीवास्तव यांनी आव्हान दिले आहे. या दोन्ही निवडी वादात सापडल्याने राष्ट्रवादी नेतृत्वाची एकप्रकारे कोंडी झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून आदरणीय अजितदादांच्या मार्गदर्शनाखाली 27 वर्षे काम करता आले. या प्रदीर्घ प्रवासात दादांनी एक दलित चेहरा व सहकारातील माझे काम पाहून वेळोवेळी ताकद दिली. दुर्दैवाने 9 महिन्यांपूर्वी दादांचे निधन झाले आणि तेव्हापासून आम्हाला खऱ्या अर्थाने पोरकेपणाची जाणीव होत आहे. सुनेत्रा वहिनींनी घेतलेल्या निर्णयाचा मी मनापासून आदर करतो. मात्र, बऱ्याच विचारांती मी माझ्यावर सोपवण्यात आलेल्या मुंबई कार्याध्यक्ष पदाच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला आहे.

लोकसेवा आयोगाच्या परीक्षांतील गैरव्यवहारासंदर्भात काही सांगायचंय?

complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या ई-मेलवर निवेदन पाठवा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अलीकडील नऊ परीक्षांमधील गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटल्याच्या कथित प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेल्या चौकशी आयोगाने या प्रकरणाशी संबंधित परीक्षार्थी, विद्यार्थी व अन्य व्यक्ती तसेच संबंधित नोंदणीकृत संस्थांना निवेदने पाठवण्याचे आवाहन चौकशी आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. ही निवेदने शपथपत्राच्या स्वरूपात मराठी किंवा इंग्रजी भाषेत आयोगाकडे सादर करावीत. १६ नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे आयोगासमोर निवेदने सादर करता येतील. निवेदनासोबत वैध ओळखपत्राची प्रत आणि संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निवेदनाची व कागदपत्रांची एक प्रत complaints.inquirycomm.mpsc@maharashtra.gov.in या ई-मेलवरही पाठवायची आहे याप्रकरणी तक्रारी दाखल करण्यासाठी आवश्यक माहिती व मदतीकरिता चौकशी आयोग कार्यालयाचा ०२२-२०८६७६७७ दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. चौकशी



आयोगाच्या या जाहीर सूचनेला प्रतिसाद म्हणून दाखल करण्यात आलेली प्रतिज्ञापत्रे आणि कागदपत्रे गोपनीय ठेवली जातील. निवेदनांची छाननी करून संबंधित व्यक्तीला आयोगासमोर साक्षीदार म्हणून तपासायचे की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार आयोगाकडे राहणार आहे.लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी पुण्यामध्ये परीक्षार्थींचे आंदोलन झाले होते. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा चौकशी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोगाची नियुक्ती केली आहे.औषध निरीक्षक परीक्षा गट- ब २०२५, महाराष्ट्र गट -ब, सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५, महाराष्ट्र गट -ब, सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र गट -क, सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५, महाराष्ट्र गट -क, सेवा संयुक्त मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२४, अन्न व औषध प्रशासन सेवा मुख्य परीक्षा, २०२३, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५, महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२५ या नऊ परीक्षांसंदर्भात निवेदने पाठवता येणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अलीकडील नऊ परीक्षांमधील गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटल्याच्या कथित प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेल्या चौकशी आयोगाने या प्रकरणाशी संबंधित परीक्षार्थी, विद्यार्थी व अन्य व्यक्ती तसेच संबंधित नोंदणीकृत संस्थांना निवेदने पाठवण्याचे आवाहन चौकशी आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी केले आहे. ही निवेदने शपथपत्राच्या स्वरूपात मराठी किंवा इंग्रजी भाषेत आयोगाकडे सादर करावीत.

संपादकीय

मतभेदांच्या पलीकडे महाराष्ट्राची संस्कृती!

फडणवीस, राज आणि उद्धव ठाकरे एकाच मंचावर; बंद दाराआडच्या चर्चेच्या वृत्तापेक्षा लोकशाहीतील संवादाचे महत्त्व मोठे, सत्ताधाऱ्यांनी व्यंगचित्रातून व्यक्त होणाऱ्या टीकेचा स्वीकार करणे हीच खरी राजकीय परिपक्वता महाराष्ट्राच्या राजकारणात एकमेकांवर टीका करण्याची परंपरा जुनी आहे. आरोप-प्रत्यारोप, राजकीय कुरघोड्या, सत्तासंघर्ष, पक्षीय वर्चस्व आणि वैचारिक संघर्ष या सगळ्यांनी राज्याचे राजकारण नेहमीच तापलेले असते.

राजकारणाच्या या धुरळ्यात कधी कधी असे क्षण निर्माण होतात की, ते केवळ राजकीय चर्चेचा विषय न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परिपक्वतेचे दर्शन घडवतात. मुंबईतील दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात घडलेला असाच एक प्रसंग सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे तीन वेगवेगळ्या राजकीय भूमिकांचे प्रतिनिधित्व करणारे नेते व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांच्या ‘महाराष्ट्राची हास्यरेषा’ या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात एकाच मंचावर आले. राजकीय मतभेदांच्या भिंती काही काळ बाजूला ठेवून या तिन्ही नेत्यांनी कलेच्या व्यासपीठावर एकत्र येणे, ही केवळ औपचारिक घटना नाही; तर महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनासाठी एक महत्त्वाचा संदेश आहे. कार्यक्रमापूर्वी तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमांनी दिले आहे. या चर्चेत नेमके काय बोलणे झाले, कोणते राजकीय विषय चर्चिले गेले किंवा भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत काही संवाद झाला का, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या भेटीला लगेच राजकीय युती, जवळीक किंवा नव्या समीकरणांचा रंग देणे घाईचे ठरेल. मात्र, या तिन्ही नेत्यांचे एकाच मंचावर येणे आणि त्यातून व्यक्त झालेला सांस्कृतिक संवाद निश्चितच महत्त्वाचा आहे. कारण राजकीय मतभेद असणे हा लोकशाहीचा दोष नाही; उलट मतभिन्नतेतूनच लोकशाही अधिक समृद्ध होत असते. प्रश्न मतभेदांचा नसतो, तर ते व्यक्त करताना आपण किती संयम, सभ्यता आणि परस्पर आदर राखतो, हा असतो. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या वक्तव्याचा संदर्भ देत मुख्यमंत्र्यांना २०२९ पर्यंत ठेवण्याचा मिश्किल टोला लगावला. त्यांच्या या वक्तव्याने सभागृहात हास्याची लहर पसरली. राज ठाकरे यांची भाषणशैली, शब्दांची फेक आणि प्रसंगानुरूप विनोद करण्याची हातोटी यामुळे हा प्रसंग अधिक रंगला. मात्र, त्यांच्या भाषणातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा राजकीय नेत्यांच्या एकत्र येण्याबाबतचा होता. एकमेकांवर टीका करणारे नेते एखाद्या कलेच्या, संगीताच्या किंवा सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमाच्या व्यासपीठावर एकत्र येऊ शकतात, कारण काही व्यासपीठे राजकीय मतभेदांपेक्षा मोठी असतात, असे त्यांनी स्पष्ट केले. ही भूमिका केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा आधार बनायला हवी. आज राजकारणात विरोधक म्हणजे शत्रू, टीकाकार म्हणजे वैरी आणि मतभिन्नता म्हणजे वैयक्तिक संघर्ष, अशी चुकीची मानसिकता वाढताना दिसते. सोशल मीडियावरील राजकीय चर्चा असो किंवा सार्वजनिक सभांमधील भाषणे, अनेकदा मुद्द्यांपेक्षा व्यक्तींवर हल्ले अधिक होतात. वैचारिक विरोधाचे रूपांतर वैयक्तिक द्वेषात होते. अशा वातावरणात तीन वेगवेगळ्या राजकीय भूमिका असलेले नेते एका मंचावर बसतात, संवाद साधतात आणि विनोदाचा आनंद घेतात, ही बाब सकारात्मक आहे. राजकारणात संघर्ष असावा; परंतु तो सभागृहाबाहेर वैयक्तिक वैरात बदलू नये. निवडणुका लढवाव्यात, सरकारवर टीका करावी, धोरणांना विरोध करावा; पण सार्वजनिक जीवनातील संवादाची दारे बंद करू नयेत. या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या टीकेबाबत मांडलेले विचार विशेष महत्त्वाचे आहेत. ब्रिटनचे माजी पंतप्रधान लॉयड जॉर्ज यांचा संदर्भ देत त्यांनी स्वतःवर हसण्याची क्षमता आणि टीका स्वीकारण्याची वृत्ती यांचे महत्त्व अधोरेखित केले. वृत्तपत्रातील व्यंगचित्र आवडत नसले तरी ते पाहून आनंद घेण्याची आणि स्वतःवरही हसण्याची वृत्ती लोकशाहीला बळ देणारी असते.

शिक्षणसंस्था चालकांना खुशखबर

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : राज्यातील शैक्षणिक संस्थांना धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक दर्जाची प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेवरील स्थगिती बुधवारी उठवण्यात आली आहे. शिक्षण संस्थांच्या अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्रांच्या वितरणासाठी अल्पसंख्याक विकास विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव किंवा सचिव या पदाचे अति वरिष्ठvअधिकारी आता सक्षम प्राधिकारी असणार आहेत. शैक्षणिक संस्थांना धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्रे ऑनलाईन पद्धतीने दिली जातात. या प्रमाणपत्राची सेवा लोकसेवा हक्क कायद्यानुसार अधिसूचित केलेली आहे. तत्कालीन अल्पसंख्याक मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचा २८ जानेवारी रोजी शासकीय दुखवटा होता. मात्र या काळात ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा बहाल करण्याची प्रमाणपत्रे वितरित झाली होती. ही बाब समोर येताच सरकारवर मोठी टीका झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीची घोषणा केली होती. अजित पवार यांच्या निधनानंतर अल्पसंख्याक विभाग सुनेत्रा पवार यांच्याकडे आला. त्यानंतर विभागाचे उपसचिव मिलिंद शेणॉय यांची तडकाफडकी बदली करण्यात आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

शिरीष हिरेमठ यांचे निधन; हृदयरोग उपचार क्षेत्रातील दिग्गज हरपला

जन सम्राट टाईम्स



पुणे । प्रतिनिधी: ज्येष्ठ आणि नामवंत हृदयरोगतज्ज्ञ, रुबी हॉल क्लिनिकच्या कार्डियाक कॅथ लॅबचे संचालक डॉ. शिरीष हिरेमठ यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. मेंदूतील गंभीर आजाराशी त्यांची दीर्घकाळ झुंज सुरू होती. त्यांच्या निधनाने पुण्यासह देशातील हृदयरोग उपचार क्षेत्रातील एक अनुभवी आणि कुशल तज्ज्ञ हरपल्याची भावना वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त होत आहे. डॉ. हिरेमठ यांनी हृदयरोगावरील उपचारांमध्ये विशेषतः गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टी प्रक्रियांमध्ये मोठे योगदान दिले. पुण्यातील पहिली एन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया 1989 मध्ये त्यांनी केली. देशभरातून तसेच परदेशातूनही रुग्ण उपचारांसाठी त्यांच्याकडे येत असत. कठीण शस्त्रक्रिया आणि उपचारपद्धतींमध्ये त्यांनी आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला होता. हृदयरोगांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि उपचार याबाबत जनजागृती करण्यासाठीही त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. हृदयविकाराच्या झटक्यावरील उपचारांमध्ये औषधोपचार आणि त्यानंतरच्या रक्तवाहिनीविषयक प्रक्रियेचा एकत्रित वापर लोकप्रिय करण्यात त्यांचे योगदान होते.डॉ. हिरेमठ यांच्या निधनानंतर ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. एस. जी. भाटे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. डॉ. हिरेमठ यांच्याशी आपला सुमारे चार दशकांचा सहवास होता. या काळात अनेक आव्हानात्मक आणि नावीन्यपूर्ण उपचारप्रक्रियांमध्ये एकत्र काम करण्याची संधी मिळाली, असे त्यांनी नमूद केले. काही प्रक्रिया महाराष्ट्रात प्रथमच करण्यात आल्या होत्या.गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टीसाठी डॉ. हिरेमठ यांची विशेष ओळख होती. रुग्णांच्या उपचारांसाठी ते कॅथ लॅबमध्ये चार ते सहा तास किंवा त्याहून अधिक काळ काम करीत असत. उदयोन्मुख वैद्यकीय तंत्रज्ञानाचा अभ्यास करून रुग्णांना अधिक चांगले उपचार देण्याची त्यांची धडपड सुरू असे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत रुग्णसेवा, तपासण्या, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये ते व्यग्र असत, अशा शब्दांत डॉ. भाटे यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.कारकिर्दीच्या शिखरावर असताना त्यांना मेंदूतील गंभीर गाठीचे निदान झाले. शस्त्रक्रिया आणि उपचारांनंतर काही महिन्यांतच ते पुन्हा कामावर रुजू झाले होते. मात्र, त्यानंतर उपचारांमुळे स्मरणशक्ती आणि आकलन क्षमतेवर परिणाम झाला. त्यांच्या निधनाने वैद्यकीय क्षेत्रातील एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

